**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. श्री.संतोष मुरलीधर वाघुले
मु.निमगाव तर्फ महा.ता.जुन्नर,जि.पुणे — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४३५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संतोष मुरलीधर वाघुले
मु.निमगाव तर्फे महा.ता.जुन्नर,जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ प्रतिनिधी श्री.जे.डी.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ श्री.ए.एम.काळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०७.०२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.०४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.०६.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.०७.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** जुन्नर ज्ञानमंदीर रस्त्याचे डांबरीकरणाचे कामाचे अंदाजपत्रक, टेंडर प्रत, ठेकेदाराचे नाव, कामाची सध्याची स्थिती, कामाचा दर्जा याबाबतची सर्व माहिती | |

## विवेचन

आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे दि.३०.९.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जुन्नर येथील रस्त्याच्या कामाबद्दलची माहिती आपण अर्ज केल्यापासून ९० दिवसांनी - दि.६.५.२००८ रोजी, म्हणजे ६० दिवस विलंबाने व अपूर्ण मिळाली, म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संतोष मुरलीधर वाघुले यांनी केली.

श्री.वाघुले यांनी दि.७.२.२.००८ रोजी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जुन्नर यांच्याकडे माहिती मागणारा अर्ज केला. त्यावेळी विभागाचे कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी होते. तत्कालीन उपअभियंता श्री.एस.ए.बासडे यांनी दि.२२.२.२००८ रोजी विभागीय कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे अर्ज पाठविला व तसे श्री.वाघुले यांना कळविले. विभागीय कार्यालयाला हा अर्ज दि.१३.३.२००८ रोजी प्राप्त झाला. विभागीय कार्यालयातील तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.डी.वाय.पाटील यांनी हा अर्ज दि.१५.३.२००८ रोजी उपअभियंता श्री.बासडे यांच्याकडे पाठवून त्यांच्याकडून माहिती मागविली. त्यांनी ती त्वरित न दिल्यामुळे दि.५.४.२००८ व दि.१९.४.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांनी श्री.बासडे यांना स्मरणपत्र पाठविले. श्री.बासडे यांनी दि.२२.४.२००८ रोजी माहिती विभागीय कार्यालयाकडे दिली व कार्यकारी अभियंता यांनी दि.२९.४.२००८ रोजी श्री.वाघुले यांना माहिती पाठविली, असे श्री.बासडे, विद्यमान कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, (उत्तर) विभाग, पुणे-१ श्री.ए.एम.काळे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम,

मंडळ, पुणे-१ यांचे प्रतिनिधी श्री.जे.डी.कुलकर्णी यांनी नमूद केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२९.४.२००८ रोजी पाठविलेली माहिती आपल्याला दि.६.५.२००८ रोजी मिळाली, असे श्री.वाघुले यांनी सांगितले.

शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंतीला मोठा उत्सव असतो. दि.१९.२.२००८ रोजी शिवजयंती होती. त्यातील तयारी व आर्थिक वर्षाअखेरची कामे यामुळे आपण तात्काळ विभागीय कार्यालयाकडे अर्ज पाठवू शकलो नाही. तसेच निविदा व अंदाजपत्रक हे विभागीय कार्यालयाकडेच असते, असे प्रतिपादन श्री.बासडे यांनी केले. आपल्याकडील माहिती देण्यास विलंब झाल्याचे त्यांनी मान्य केले.

अपीलकर्त्याने मूळ अर्जापेक्षा प्रथम अपिलात आणखी काही मुद्दयांचे स्पष्टीकरण मागितले होते व कामाच्या पध्दतीविषयी आक्षेप नोंदविले होते. ते 'माहिती'पेक्षा कार्यवाहीविषयक होते. तसेच प्रथम अपिलापूर्वीच माहिती नि:शुल्क देण्यात आलेली असल्यामुळे तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, असे प्रतिपादन श्री.जे.डी.कुलकर्णी यांनी केले. निविदा व अंदाजपत्रक याची प्रत फक्त विभागीय कार्यालयाकडेच असते, हे म्हणणे योग्य नाही. उपविभागीय कार्यालयालाही ती पाठविली जाते, असे श्री.काळे यांनी स्पष्ट केले.

दि.२९.४.२००८ रोजी दिलेल्या माहितीत 'कामे प्रगतीत' असल्याचे म्हटले आहे. परंतु त्यावेळी गटारे खोदलेलीच नव्हती, तरीही गटाराचे काम प्रगतीत असल्याचे माहितीत नमूद केले आहे, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. मात्र कामाचा कालावधी पूर्ण झालेला नसल्यामुळे हे उत्तर योग्य आहे, असे श्री.काळे व श्री.कुलकर्णी यांनी नमूद केले. कामाची मूळ मुदत सप्टेंबर २००७ -मध्ये संपत होती. त्यानंतर ती वाढवून देण्यात आली होती. त्यामुळे कामे प्रगतीत असल्याची माहिती देण्यात आली, असे उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता पुढील बाबी स्पष्ट होतात:

(१) अपीलकर्त्याच्या अर्जाची हाताळणी योग्य प्रकारे झालेली नाही व माहिती देण्यास विलंब झालेला आहे. अपीलकर्त्याला विलंबामुळे माहिती नि:शुल्क देण्यात आली, हे म्हणणे रास्त नाही.

अपीलकर्ता दारिद्र्यरेषेखालील असल्यामुळे माहिती निःशुल्क देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार बंधनकारकच आहे.

(२) जुन्नर उपविभागीय कार्यालयाने दि.२२.२.२००८ रोजी पाठविलेले पत्र सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांना दि.१३.३.२००८ रोजी-म्हणजे २१ दिवसांनी प्राप्त झाल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, (उत्तर) विभाग, पुणे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त सादर केलेल्या टिपणीवरुन दिसते. इतके दिवस का लागले, त्याचे नेमके कारण काय, हे उपस्थित अधिकारी स्पष्ट करु शकले नाहीत.

(३) मूळ माहितीत न दिलेले व कामासंबंधी आक्षेप घेणारे अनेक मुद्दे श्री.वाघुले यांनी प्रथम अपिलाच्या अर्जात नोंदविले आहेत. उदा.वापरलेली खडी स्थानिक विहिरीवरील डबराची फोडलेली आहे, खाणीवरची नाही. एक तर हे मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीविषयक आहेत व जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरात स्पष्टपणे नमूद केलेले नाही, अशा बाबींविषयी आहेत. तसेच त्यावेळी याची पुराव्यानिशी नोंद केलेली नाही.

(४) वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अपीलकर्त्याचा अर्ज उपअभियंता यांनी पाच दिवसांत कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते. परंतु शिवजयंती उत्सव व आर्थिक वर्षाअखेरचे काम याबाबत त्यांनी केलेले स्पष्टीकरण मान्य करण्यासारखे आहे. ते १५ दिवस, अर्ज वर्ग करण्यास असलेल्या मुदतीचे पाच दिवस, माहिती देण्यास असलेल्या मुदतीचे ३० दिवस वगळले तरीही दि.७.२.२००८ च्या अर्जानुसार दि.२९.४.२००८ ला माहिती दिली, हे लक्षात घेता ३० दिवस विलंब झाला आहे.

(५) उपविभागीय कार्यालयाने विभागीय कार्यालयाकडे व विभागीय कार्यालयाने पुन्हा उपविभागीय कार्यालयाकडे अशा प्रकारे अर्ज परस्परांकडे पाठविण्याचा मार्ग अनुसरला आहे. मात्र उपअभियंता, जुन्नर श्री.ए.एस.बासडे व कार्यकारी अभियंता श्री.डी.वाय. पाटील या दोघांनीही आपल्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास तात्काळ देण्याची तत्परता दर्शविलेली नाही. उपअभियंता हे त्यावेळी जन माहिती अधिकारी नसले, तरी जन माहिती अधिकाऱ्यांनी

त्यांच्याकडे लेखी स्वरुपात माहितीची मागणी केल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ते जन माहिती अधिकारी ठरतात. निविदा व अंदाजपत्रक अंतिम स्वरुपात करण्याचे काम कार्यकारी अभियंता यांच्याकडून होत असल्यामुळे व प्रामुख्याने ही माहिती त्यांच्याच कक्षेतील असल्यामुळे कार्यकारी अभियंता श्री.डी.वाय.पाटील अपीलकर्त्यास ती त्वरित देऊ शकले असते. कामाच्या सद्यस्थितीबाबतची माहिती श्री.बासडे मुदतीत देऊ शकले असते. परंतु दोघांनीही तसे केलेले नाही. हे लक्षात घेता कार्यकारी अभियंता श्री.डी.वाय.पाटील व उपअभियंता श्री.ए.एस.बासडे हे दोघेही विलंबाला जबाबदार ठरतात.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.डी.वाय.पाटील यांनी मूळ अर्जावरील कार्यवाही, माहिती देण्यास झालेला विलंब व शास्ती याबाबतचा खुलासा तीन दिवसात आयोगाला सादर करावा, तसे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.जे.डी.कुलकर्णी यांनी त्यांना त्वरित कळवावे, श्री.डी.वाय.पाटील यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर शास्तीबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.डी.वाय.पाटील यांनी दि.५.१०.२००९ रोजी त्यांचा खुलासा आयोगाला सादर केला. श्री.वाघुले यांचा अर्ज जुन्नर उपविभागाकडून दि.१३.३.२००८ रोजी आपल्याला प्राप्त झाला. दि.१५.३.२००८ रोजी माहिती त्वरित देण्याविषयी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, जुन्नर (श्री.बासडे) यांना कळविले. त्यानंतर दि.५.४.२००८ दि.१९.४.२००८ अशा दोन पत्रान्वये उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, जुन्नर (श्री.बासडे) यांना माहितीबाबत स्मरण देण्यात आले. त्यांनी दि.२२.४.२००८ च्या पत्रान्वये आपल्याकडे माहिती पाठविली. ती प्राप्त होताच दि.२९.४.२००८ च्या पत्रान्वये श्री.वाघुले यांना पाठविली, असे श्री.पाटील यांनी संबंधित स्मरणपत्रांच्या प्रतीसह खुलाशात नमूद केले आहे. 'माहिती अद्यापपर्यंत आपणाकडून प्रलंबित आहे, ती त्वरित द्यावी, अर्जदार अपिलात गेल्यास होणाऱ्या परिणामांची संपूर्ण परिणामाची जबाबदारी आपणावर राहील,' असे उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर विभाग), पुणे-१ यांनी श्री.बासडे यांना

पाठविलेल्या स्मरणपत्रामध्ये म्हटले आहे. विभागीय कार्यालय व उपविभागीय कार्यालय यांच्याकडून श्री.वाघुले यांना एकूण पाच मुद्दयांची एकत्रित माहिती द्यावयाची होती. त्यामुळे फक्त विभागाकडील माहिती पाठवून त्यांना उपयोग झाला नसता. कारण संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याशिवाय अपीलकर्त्यास त्यांच्या शंकेचे निरसन करणे, तसेच माहितीचे पृथक्करण करणे शक्य नव्हते, असे श्री.पाटील यांनी खुलाशात म्हटले असून 'प्रत्येक कामाचे कार्यारंभ आदेश ठेकेदारास दिल्यानंतर त्या कामाची अंदाजपत्रक व टेंडरची प्रमाणित प्रत विभागाकडून उपविभागाकडे पुढील काम करण्याकरिता पाठविण्यात येत असते. त्यानुसार उपअभियंता यांनी त्यांचेकडे दि.७.२.२००८ चा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर माहिती अपीलकर्ता यांना देणे आवश्यक होते, कारण वरील सर्व माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती,'असेही नमूद केले आहे. 'कोठल्याही माहितीचा अर्ज उपविभागात आल्यानंतर तो विभागीय कार्यालयास माहिती अधिकारी यांना प्रथम पाठविण्यात येत असे,' व त्यांच्या मार्गदर्शनाखाली नंतर पुढील कार्यवाही होत असे, असे श्री.बासडे यांनी दि.३.१०.२००९ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. शिवजयंती, आर्थिक वर्षाअखेरच्या कामांची पाहणी आदींमुळे विलंब झाल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

'जुन्नर येथील ज्ञानमंदिर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम हे दि.२०.२.२००९ रोजी अंतिम झालेले आहे. ठेकेदाराचे अंतिम देयक या कार्यालयास प्राप्त झाले असून धनादेश आजमितीस देण्यात आलेला नाही,' असे विद्यमान कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे श्री.व्ही.पी.जाधव यानी दि.३.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

वरील निवेदने लक्षात घेता जन माहिती अधिकारी म्हणून श्री.डी.वाय.पाटील यांनी अधिक तत्परतेने व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गाभा लक्षात घेऊन कृती करावयास हवी होती. अपीलकर्त्यास माहितीचे पृथक्करण करणे शक्य होते की नाही, अपीलकर्त्याचा प्रश्न आहे.

श्री.डी.वाय. पाटील यांनी समर्थनार्थ तो मांडणे गैरवाजवी आहे. असलेली माहिती ते त्वरित देऊ शकले असते. त्याऐवजी त्यांनी उपअभियंता यांना व उपअभियंता यांनी त्यांना पत्रव्यवहार करण्यात वेळ काढला आहे. मात्र श्री.बासडे अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती देऊ शकले असते, असे त्यांच्या स्वत:च्या व श्री.पाटील यांच्या खुलाशावरुन व अनुषंगिक पत्रव्यवहारावरुन स्पष्ट होते. त्यामुळे विलंबास प्रामुख्याने तेच जबाबदार असून शास्तीस पात्र ठरतात. शिवजयंती उत्सवाच्या काळातील तयारी, आर्थिक वर्षाअखेरची कामे या सर्व बाबींचा कालावधी गृहीत धरुनही विवेचनात क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देण्यास तीस दिवस विलंब झाला आहे.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी म्हणून तत्परतेने स्वत:कडे उपलब्ध असलेली माहिती न दिल्याबद्दल व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील पारदर्शकतेचे सूत्र लक्षात घेऊन कृती न केल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.डी.वाय.पाटील (सध्या अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे विभाग, पुणे) यांना समज देण्यात येत आहे. याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी त्याचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) माहिती देण्यास झालेल्या तीस दिवसांच्या विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जुन्नर-१ श्री.एस.ए.बासडे यांना(३०X२५०=७५००रुपये) रुपये ७५००/- इतकी शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती वसूल करुन ती दि.१०.११.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे यांनी करुन, तसेच याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरविंद कृष्ण सिधये
स.नं.६५/१ब/१, जाधववाडी(फ), ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण उपविभाग, फलटण, जि.सातारा — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.०१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा प्रतिनिधी श्री.एम.ए.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण उपविभाग, फलटण, जि.सातारा श्रीमती रेश्मा माळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.४.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दिली नाही. त्यांना वाचविण्यासाठी आपल्याला उपस्थित राहता येऊ नये अशा पध्दतीने अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली, म्हणून त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अरविंद कृष्ण सिधये यांनी अपील अर्जात केली आहे.

श्री.सिधये यांनी संदिग्ध स्वरूपात माहिती मागितली होती. तसेच मूळ अर्जात व प्रथम अपिलातही 'आपल्याला नैसर्गिक न्याय मान्य नाही काय', 'जन माहिती अधिकाऱ्याला वाचविणे हा हेतू आहे काय,' अशा स्वरूपाची विचारणा केली होती. तथापी निश्चित कोणती माहिती पाहिजे आहे ते कळवावे, असे पत्र त्यांना विहित मुदतीत पाठविले होते. त्यानंतर त्यांनी दुसरा अर्ज केला. त्याबाबतही तसेच पत्र पाठविले व ज्या मुद्दयांची माहिती देणे शक्य होते, ती दिली. सुनावणीच्या दोन तारखांना ते गैरहजर होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहितीचा तपशील कळवून त्यांनी माहिती प्राप्त करून घ्यावी, असा आदेश देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले, असे जन माहिती अधिकारी श्रीमती रेश्मा माळी यांनी नमूद केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.ज्ञानोबा मारुती मोगल,
सर्व्हे नं.४४ केळेवाडी, विश्वशांती चौक, पौड रोड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त ,
विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** क्षेत्रिय अधिकारी,
कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६४/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त ,
विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.विजय दहिभाते

**जन माहिती अधिकारी** क्षेत्रिय अधिकारी,
कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे श्री.नितीन रमेश उदास

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.०५.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०३.०७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०७.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

वार्ड क्र.६३ वनाज कंपनी येथील वॉर्डस्तरीय योजनेमधून बांधण्यात येत असलेल्या अभ्यासिकेविषयीची माहिती. प्रस्तावाच्या छायांकित प्रती, अधिकाऱ्यांचे अभिप्राय, जागेचा तपशील दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत, जागा कोणाच्या मालकीची आहे, मालकी दर्शविणारा ७/१२ चा उतारा. काम ज्या ठिकाणी चालू आहे, त्या ठिकाणी यापूर्वी काय असल्याची (रिकामी जागा, घरे इ.)महानगरपालिका दप्तरी नोंद होती, त्याची माहिती.

## विवेचन

दि.२९.१.२००९ रोजी आयोगाने घेतलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता गैरहजर त्यामुळे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते.

वॉर्डस्तरीय योजनेतून झालेल्या कामासंबंधीची माहिती आपण एका अर्जाद्वारे मागितली होती. त्यात एका विशिष्ट ठिकाणी अभ्यासिकेचे काम चालू असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले होते. ही अभ्यासिका ज्या जागेवर बांधण्यात येत आहे, त्या जागेवरील यापूर्वीची नोंद व मालकीचा ७/१२ उतारा अशी माहिती आपण मागितली होती. या जागेवर पूर्वी काय असल्याची (रिकामी जागा, घरे इ.) महानगरपालिका दप्तरी नोंद आहे याची माहिती व ७/१२ उताऱ्याची प्रत दिली नाही, असे अपीलकर्ता श्री.ज्ञानोबा मारुती मोगल यांनी अपील अर्जात म्हटले आहे.

श्री.मोगल यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. ७/१२ उताऱ्याची प्रत व जागेसंबंधीची नोंदीची माहितीही देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.नितीन रमेश उदास यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अपीलकर्त्याची माहिती मिळाल्याची पोहोच असल्याची प्रत त्यात आहे. हे लक्षात घेता अपीलकर्त्यास पूर्ण माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५ .१०.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे
अध्यक्ष, राजवैभव प्रतिष्ठान, औंध, ता.खटाव, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७/ सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** दत्तात्रय पोपटराव जगदाळे
अध्यक्ष, राजवैभव प्रतिष्ठान, औंध, ता.खटाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा श्री.आर.के.वाघ

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा श्री.घ.मा.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>ग्रामपंचायत निधीचा गैरवापर केल्याने औंधचे सरपंच, उपसरपंच यांना पदमुक्त करुन त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत व ग्रामसेवक यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत दि.४.१२.२००६ रोजीच्या राजवैभव प्रतिष्ठान, औंध यांचे तक्रारी अर्जानुसार जिल्हा परिषदेकडून केलेल्या कार्यवाहीतील सर्व कागदपत्रे मिळण्याबाबत. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

ग्रामपंचायत निधीच्या गैरवापरासंबंधी औंधचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीबाबतच्या आपल्या तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.दत्तात्रय पोपटराव जगदाळे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास विलंब केला. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर आपल्याला माहिती प्राप्त झाली म्हणून जन माहिती अधिकारी याच्यावर शिस्तभंगाची व दंडात्मक कारवाई करावी, या मागणीसाठी श्री.जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी माहिती मिळाल्यानंतर आपल्याला न देता दडवून ठेवली व जाणीवपूर्वक विलंब केला, अशी तक्रार श्री.जगदाळे यांनी केली.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार भारतीय नागरिकांना नावाने अर्ज व अपील करणे आवश्यक आहे, परंतु श्री.जगदाळे यांनी पदनामाने अर्ज व अपील केले आहे. याबाबत दक्षता घेण्याची समज आयोगाने अपीलकर्त्यांना दिली.

श्री.जगदाळे यांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे केलेला अर्ज आपल्याला दि.२.४.२००७ रोजी प्राप्त झाला. संबंधित माहिती आपल्या कार्यालयाकडे नसल्याचे दि.५.४.२००७ रोजी आपण त्यांना कळविले व त्याच दिवशी माहितीसाठी अर्ज गटविकास अधिकारी, खटाव यांच्याकडे पाठविला. श्री.जगदाळे यांच्या मूळ तक्रारीचा अर्ज जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडील दि.७.१२.२००६ च्या पत्रान्वये प्राप्त झाला. दि.१६.१२.२००६ रोजी तो गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव व ग्रामपंचायत, औंध यांच्याकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला होता. त्याबाबतच्या अहवालाविषयी त्यांना स्मरण देण्यात आले होते. गटविकास अधिकाऱ्यांनी दि.५.५.२००७ रोजी पाठविलेला अहवाल आपल्याला दि.९.५.२००७ रोजी प्राप्त झाला. श्री.जगदाळे यांना दि.१०.५.२००७ च्या पत्रान्वये याबाबतची वस्तुस्थिती कळविण्यात आली होती. श्री.जगदाळे यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे केलेल्या अपिलातील सुनावणीतील निर्णयानुसार श्री.जगदाळे यांनी शुल्क भरल्यानंतर रजिस्टर टपालाने त्यांना माहिती पाठविण्यात आली, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), सातारा जिल्हा परिषद श्री.घ.मा.जाधव यांनी सविस्तर लेखी निवेदनाद्वारे व तोंडी नमूद केले. हा खुलासा लक्षात घेता, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.घ.मा.जाधव यांनी माहिती देण्यास जाणीवपूर्वक विलंब केल्याचे दिसत नाही, सबब शास्ती व दंडात्मक कारवाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१४.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.महादेव शंकर वाळे
४१, विवेकानंद नगर,
विमानतळासमोर, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर

**उत्तरवादी**

१) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
श्री.परमेश्वर आश्रमशाळा, कामती खुर्द,
ता. मोहोळ,जि. सोलापूर

२) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| ३ | उपस्थित<br>**अपिलीय प्राधिकारी तथा :-** विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी सोलापूर<br>श्रीमती मनिषा फुले | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.०१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.०६.२००८ |
| | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>श्री परमेश्वर प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, कामती (खुर्द) मध्ये सन १९९८ पासून किती जादा तुकडया मंजूर करण्यात आल्या, त्या मंजुरीपत्राची प्रत, सेवकसंच, नवीन कर्मचारी भरतीसाठीची उमेदवार यादी, मागासवर्गीय अनुशेष रोस्टर रजिस्टर व तदनुषंगिक एकूण १४ मुद्यांची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ते श्री. महादेव शंकर वाळे यांनी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर यांच्याकडे केलेला अर्ज त्यांनी सबंधित शाळेकडे वर्ग केला. परंतु शाळेने अर्जाची दखल घेतली नाही, व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी योग्य कार्यवाही केली नाही, या कारणावरून श्री. वाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या प्रती मिळाल्याची अपीलकर्त्याची पोच अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१. १० .२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

१. ॲड. श्री. जयराज रामचंद्र विजापुरे
२. श्री. राजेश बटलवार तर्फे
ॲड. श्री. जयराज रामचंद्र विजापुरे — अपीलकर्ता
ए-११, महिन्म सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-५२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयातकर प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आयातकर अधीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०८ + २५४३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** १. ॲड. श्री. जयराज रामचंद्र विजापुरे
२. श्री. राजेश बटलवार तर्फे ॲड. श्री. जयराज रामचंद्र विजापुरे
ए-११, महिन्म सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग, कर्वेनगर, पुणे-५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयातकर प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री. राजेंद्र मुठे

**जन माहिती अधिकारी** तथा आयातकर अधीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ मधुकर पोपटराव नागपुरे

| **अपील क्र.** | **जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख** | **जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख** | **प्रथम अपिलाची तारीख** | **अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख** |
|---|---|---|---|---|
| २५०८/ पुणे | २०.५.२००८ | १६.६.२००८ | ११.७.२००८ | २२.९.२००८ |
| २५४३ / पुणे | २०.५.२००८ | ३०.५.२००८ | १९.७.२००८ | २२.९.२००८ |

**माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे.**

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २९.१.२००९ व दि. २५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १२.८.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुधारित जकात नियम २००७ नुसार हरकती व सूचनांसाठी आपण दिलेल्या अर्जावर आयातकर प्रमुखांनी सुनावणी न घेता स्थायी समितीने ठराव अंतिम कसा केला, अशी विचारणा ॲड. जयराज रामचंद्र विजापुरे यांनी स्वतःकरिता व श्री. राजेश बटवलकर यांच्या वतीनेही केली होती. त्याबाबत चुकीची माहिती दिली, असे ॲड.विजापुरे यांनी अपीलअर्जात म्हटले आहे. मात्र त्या विषयाबाबत सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर नियमानुसार सर्व प्रक्रिया पार पाडून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला व दि. ६.३.२००८ रोजी शासनाने त्याला मान्यता दिली. हा सर्व तपशील ॲड. विजापुरे यांना कळविण्यात आला. दिलेल्या कागदपत्रांवर त्यांची पोहच आहे. मूळ हरकतीवर झालेली सुनावणी योग्य नाही, असा त्यांचा आक्षेप असून म्हणून माहिती चुकीची आहे, असा त्यांचा दावा आहे. हा भाग माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा आयातकर अधीक्षक श्री. मधुकर पोपटराव नागपुरे यांनी केले. माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांच्या प्रतिनिधी श्रीमती सारिका राऊत यांनी मान्य केले.

जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिपादन योग्य असल्याचे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९.१०.२००९**